# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०९/२०२४ (शनिवार) दुपार**

---

## पो.स्टे. कळमेश्वर हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ०६/०९/२०२४ रोजी पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील मौजा सोनेगाव शिवार येथे काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी मौजा सोनेगाव शिवार येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) ज्ञानेश्वर विठोबाजी मोदरकर वय ३५ वर्ष रा. निंबोली २) कन्हेया विजय गजभिये वय २८ वर्ष रा. सोनेगाव** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०२ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) विवो कंपनीचा मोबाईल फोन किंमती ७०००/—रू. २) नगदी ३५०० रू. असा एकुण १०,५००/— रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे कळमेश्वर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोनि मनोज काळबांडे, पोना सुरेंद्र ठाकरे यांनी पार पाडली.

## पोस्टे काटोल हद्दीत अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

दि. ०६/०९/२०२४ रोजी चे ०७/०४ वा. ते ७/४५ वा. दरम्यान मौजा डोंगरगाव येथे गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारी महिला आरोपी ही मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आली. आरोपीचे ताब्यातून ३ प्लास्टीक ड्रम मध्ये प्रत्येकी २०० लिटर प्रमाने एकुण ६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा कि. १२०००/— रू. व ३ ड्रमची कि. १५००/—रू. पांढ—या रंगाच्या प्लास्टीक डपकी मध्ये १० लिटर मोहाफुल गावठी दारू. कि. ५००/— रू. असा एकुण किंमती १४०००/— रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. महिला आरोपी विरुद्ध पो.स्टे काटोल येथे कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे काटोल येथील ठाणेदार पोनि निशांत मेश्राम यांचे नेतृत्वात पोअं गुलाब भालसागर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर